फौ.कि.अर्ज क्र.६२/२०१८

वंदना वि. भारत

**<u>निशानी ३२ वरील आदेश</u>**

१. गैरअर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा त्याचे विरूध्द झालेला पुरावा बंदचा आदेश रद्य करून गैरअर्जदाराला पुरावा देण्याची संधी मिळणे करीता दाखल केला आहे. गैरअर्जदाराने अर्जात कथन करताना गैरअर्जदाराच्या घरचे लग्न असल्यामुळे शपथपत्र देवु शकला नसल्याचे कारण नमुद केले आहे. अर्जदाराने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करून प्रकरण प्रलंबित ठेवण्यासाठी व न्यायालयाच्या वेळ व्यर्थ घालवण्यासाठी गैरअर्जदार पुरावा देण्यासाठी टाळाटाळ करीत आहे त्यामुळे गैरअर्जदाराचा प्रस्तुचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे. प्रस्तुत प्रकरणातील कागदपत्राचे आवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, गैरअर्जदाराने दि.३.०८.२०२४ रोजी नि.क्र. ३१ येथे स्वत: चे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले त्यानंतर दि.१७.०६.२०२५ रोजी प्रस्तुतचे प्रकरण तडजोडीकरीता रेणापूर येथे मध्यस्थी केंद्राकडे पाठवण्यात आले. व त्याच दिवशी तडजोड होत नसले बाबत मध्यस्थीकेंद्राकडुन अहवाल प्राप्त झाला. त्यानंतर दि.०३.११.२०२५ रोजी गैरअर्जदाराचा उलटतपास पुर्ण करण्यात आला. त्यानंतर दि. ०४.१२.२०२५ , १६.१२.२०२५, १७.०१.२०२६, १६.०२.२०२६, १३.०३.२०२६ ०७.०४.२०२६, २८.०४. २०२६ या तारखांना गैरअर्जदाराला पुढील पुरावा देण्याची संधी देण्यात आली. परंतु संधी देवुनही गैरअर्जदाराने पुढील पुरावा न दिल्यानंतर २८.०४.२०२६ रोजी गैरअर्जदाराचा पुरावा बंद करण्यात आला. गैरअर्जदाराने दिलेले कारण संयुक्तीक वाटत नसले तरी नैसर्गिक न्यायातत्वाचा विचार करता गैरअर्जदाराला पुढील पुरावा सादर करण्याची संधी देणे योग्य होईल. परंतु त्याच वेळी गैरअर्जदारातर्फे झालेला उशिर दुर्लक्षित करता येणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदाराने प्रस्तुत अर्जाचा खर्च रक्कम रू २०० अर्जदारास द्यावेत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by POOJA ANAND APTE
Date: 2026.05.14 15:58:09 +0530

**दिनांक : १४/०५/२०२६**

**( पी.ए.आपटे)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रेणापूर**